CMYK




अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । बुधवार, दि. ३० ऑक्टोबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ३२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

# काँग्रेसने खेळवले! दिलीप मानेंना 'एबी फॉर्म' दिलाच नाही!

## प्रणितींनी ताब्यात घेतलेला एबी फॉर्म गेला कुठे? समर्थकांचा भडका!

# विश्वासघात!

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

*दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार दिलीप माने आणि त्यांचे हजारो समर्थक मंगळवारी सकाळी ९ पासून पक्षाच्या अधिकृत एबी फॉर्मची उत्सुकतेने वाट पहात होते ... आता येईल ... थोड्या वेळात येईल ... थोडे थांबा ... काँग्रेसच्या नेत्यांकडून निरोप येत होते परंतु काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी चार दिवसांपूर्वी जो एबी फॉर्म ताब्यात घेतल्याचे सांगितले होते तो मानेंपर्यंत पोहोचलाच नाही! अखेर मुदत संपली आणि काँग्रेसचे अधिकृत उमेदवार असलेले दिलीप माने दक्षिण मैदानात 'अपक्ष' ठरले! संतप्त माने आणि त्यांच्या समर्थकांनी हे मॅचफिक्सिंग ... दगाफटका ... विश्वासघात ... या शब्दात आपला उद्रेक प्रकट केला.*


उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मुदत संपल्यानंतर दक्षिण सोलापूर काँग्रेसमध्ये वादाचा भडका उडाला. काँग्रेस पक्षाने या मतदार संघातून माजी दिलीप माने यांच्या नावाची घोषणा केली. त्यानुसार माने यांनी मंगळवारी मोठे शक्तीप्रदर्शन करत अर्ज भरला मात्र शेवटच्या क्षणापर्यंत ए.बी. फॉर्म उपलब्ध न केल्याने माने यांची काँग्रेस पक्षाकडून दिली गेलेली उमेदवारी लटकली. या प्रकारामुळे स्वतः माने हे संतप्त झाले शिवाय कार्यकर्त्यांच्या भावनांचा बांध फुटला. माने यांनी काँग्रेसवर थेट मॅच फिक्सींगचे आरोप करत दुसऱ्या उमेदवारांना सावध केले. तर दुसरीकडे माने यांचा विश्वासघात केला आहे, ए.बी. फॉर्म उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पक्षश्रेष्ठींची असते. उमेदवारी जाहीर करूनही एबी फॉर्म न देणे म्हणजे हा मोठा विश्वासघात असल्याचा आरोप समर्थकांनी केला आहे. थेट शिंदे फॅमिलीचे नाव घेवून माने समर्थकांनी हे टीकास्त्र सोडले.

झाले असे की, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीने तीन दिवसांपूर्वी या मतदार संघातून माने यांच्या नावाची घोषणा केली होती. त्यानुसार माने यांनी मंगळवारी अर्ज भरण्याची तयारी केली. काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात होटगी रस्त्यावरील निवासस्थानापुढे जमले होते. सकाळपासूनच माने हे ए.बी. फॉर्मची वाट पहात होते. त्यांना तासात येईल, दोन तासात येईल अशी उत्तरे श्रेष्ठींकडून येत होती. सकाळी वाजता तयार झालेले माने दुपारी दीडच्या सुमारास वाजत गाजत माने हे निवडणूक कार्यालयात गेले. मात्र तरीही त्यांना ए.बी. मिळाला नाही. फॉर्मविषयी शंका आल्यानंतर त्यांनी काँग्रेस पक्ष तसेच अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली. अर्ज भरण्याची मुदत संपेपर्यंत एबी फॉर्म उपलब्ध झाले नाही तेव्हा माने हे स्वतः अस्वस्थ झाले. कार्यालयाच्या बाहेर आल्यानंतर माने यांनी काँग्रेसवर तोफ डागली. हे काँग्रेस संपवण्याचे काम आहे, ही सर्व आपापल्या सगेसोयऱ्यांना निवडून आणण्यासाठी मॅचफिक्सींग आहे, असा आरोप त्यांनी केला.



### असा घडला घटनाक्रम

माने यांच्या निवाससथानी सकाळी नऊ पासून ते दुपारी दीडपर्यंत अर्ज दाखल करण्यासाठी कार्यकर्ते थांबून होते. हजारों समर्थक कार्यकर्ते जमा झाले होते. कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह देखील होता. शेवटी दीड वाजेपर्यंत ए.बी. फॉर्म न मिळाल्याने माने बाहेर पडले आणि अर्ज दाखल केला. अर्ज दाखल केल्यानंतर माने म्हणाले, काँग्रेस आणि अपक्ष उमेदवारी भरली. तीन पर्यंत फॉर्म न मिळाल्याने अपक्ष अर्ज भरला, काही तरी गोंधळ सुरू असल्याचे लक्षात आल्याने शेवटच्या क्षणापर्यंत अर्ज मिळाला नाही, वाट पाहून अपक्ष लढत आहे. आता सर्व कार्यकर्त्यांशी बोलून आता चार तारखेला निर्णय घेतला जाईल,असा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला.





### दक्षिणच नव्हे तर जिल्ह्यात माने ब्रँड

कार्यालयाबाहेर जमलेल्या कार्यकर्त्यांनी आपला संताप व्यक्त केला.हे सुडबुद्धीचे राजकारण आहे. पक्षश्रेष्ठींना काँग्रेस हद्दपार करायची आहे. शिंदे परिवाराने आमचा विश्वास घात केला आहे.श्रेष्ठींनी एवढे लक्षात ठेवावे की,केवळ दक्षिणमध्ये नाही तर सोलापूर जिल्ह्यात दिलीप माने ब्रँड आहे,अशा शब्दात कार्यकर्त्यांनी माध्यमांशी बोलताना इशारा दिला.

### हा दगाफटकाच

#### सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे अवघड

उमेदवारी दाखल करून बाहेर आल्यानंतर माने यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यांच्या चेहऱ्यावरची अस्वस्थता लपून राहिलेली नव्हती. पक्षाकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतरही एबी फॉर्म उपलब्ध होत नाही. हा दगाफटकाच आहे. आता कुणावर विश्वास ठेवायचा, अशा शब्दात माने यांनी आपला संताप व्यक्त केला. सकाळपर्यंत मी फॉर्मची वाट पाहिली. नाना पटोल, सुशीलकुमार शिंदे,प्रणिती शिंदे या सर्वांशी मी संपर्क साधला मात्र जरा थांबा हेच उत्तर ऐकायला मिळाले. फॉर्म उपलब्ध होता पण सारेचजण गप्प बसले. आपल्या हक्काची ही जागा असताना ठाकरे गटाला ती गेलीच कशी. ही मॅच फिक्सिंग आहे. भुलभुलैय्या आहे.आता सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे अवघड आहे, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

### हे काँग्रेस संपल्याचे द्योतक

पारंपरिक काँग्रेसची जागा असताना लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला मताधिक्य मिळाले, असे असताना सेनेला जागा कशी? असा प्रश्न उपस्थित करून माने म्हणाले की, काँग्रेस पक्ष आपल्या मित्र पक्षाला भिऊन राहतो हे अवघड आहे. पक्षश्रेष्ठींची भूमिका आक्रमक असली पाहिजे. असे झाले नाही. त्यामुळे हे काँग्रेस संपण्याचे द्योतक वाटत आहे, अशी खंतही माने यांनी व्यक्त केली.

### माने घराण्याला जाणीवपूर्वक त्रास

पक्षाने हा प्रकार केला यात दिलीप माने म्हणून माझे नुकसान नाही, माझे पंचायत समिती जिल्हा परिषदमध्ये वर्चस्व आहे, सहकारी सोसायट्या माझ्या आहेत. आमच्या घराण्याला जाणीवपूर्वक त्रास देण्याचा प्रयत्न केला आहे. जिल्ह्याची नाही तर महाराष्ट्राची काँग्रेस कमी पडली, असा आरोपही माने यांनी केला. आता कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुढील निर्णय घेऊ असे माने म्हणाले.

### एबी फॉर्म होता पण पोहोचवला नाही

मला शेवटच्या क्षणापर्यंत वाट बघण्यासाठी सांगण्यात आले. ऐन वेळी मला एबी फॉर्म दिला नाही. एबी फॉर्म होता पण माझ्यापर्यंत पोहोचवला नाही, असे माने म्हणाले. ज्यांनी तिकीट जाहीर केले त्यांची ही जबाबदारी होती एबी फॉर्म देखील आणला पाहिजे,त्यामध्ये सगळेच कमी पडलेत, काँग्रेस उमेदवारला संधी न देता मित्र पक्षाला जागा सोडण्यात आली. आता कोणीही विश्वास ठेवू नका,असे आवाहन माने यांनी कार्यकर्त्यांना केले.


---

# प्रचंड विरोध! उमेदवार बदलण्याची नामुष्की

## राजू खरे IN सिद्धी कदम OUT

✔ सोलापूर/प्रतिनिधी





माजी आमदार रमेश कदम यांची कन्या सिद्धी कदम यांच्या उमेदवारीला पक्षातून प्रचंड विरोध झाल्याने अखेर शरद पवारांना उमेदवार बदलण्याची नामुष्की ओढावली. त्यानंतर पवार यांनी उद्योजक राजू खरे यांना उमेदवारी दिली आहे. याबाबतचे पत्र पक्षाकडून निवडणूक अधिकाऱ्यांना पाठवण्यात आले आहे.

शरद पवार यांच्या पक्षाकडून मागील आठवड्यात सिध्दी कदम यांची मोहोळमधून उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. तरुण आणि उच्चशिक्षित असल्याने त्या या निवडणुकीत बाजी मारणार का, याबाबत उत्सुकता वाढली होती. मात्र, उमेदवारी जाहीर होताच पक्षातील स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून विरोध सुरू झाला होता. मोहोळ येथील सर्वपक्षीय समितीच्या नेत्यांनी तातडीने बारामती येथे गोविंद बाग गाठून शरद पवार यांची भेट घेतली. कदम यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे. यावेळी शरद पवार यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घ्या, असा सल्ला दिला होता. त्यानंतर या समितीतील काही मंडळींनी जयंत पाटील यांच्याशी फोनवरून चर्चा केली. सर्व मंडळींनी सिद्धी कदम यांच्या नावाला कडाडून विरोध करत राजू खरे यांचे नाव उचलून धरले. हा जोराचा विरोध पाहून जयंत पाटील यांनी त्याची दखल घेतली. त्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना पत्र पाठवून सिध्दी कदम यांचा ए. बी. फॉर्म रद्द केल्याचे कळवले.

### कोण आहेत राजू खरे?

राजू खरे हे पंढरपुरातील असून उद्योजक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी युवा सेनेतून राजकारणाची सुरूवात केली. मागील काही वर्षांपासून ते मतदारसंघात सामाजिक कार्याच्या माध्यमातून सक्रीय आहेत. महिनाभरापुर्वीच त्यांनी शरद पवारांची भेट घेतल्याने त्यांच्या उमेदवारीबाबत चर्चा सुरू झाल्या होत्या.

---

# अखेर अपक्षच! काडादींची 'तुतारी'साठी पाच तासांची प्रतिक्षा!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

दक्षिण विधानसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवट दिवशी अनेक ट्विस्ट निर्माण झाले. शेवटच्या क्षणी काँग्रेसचा ए.बी. फॉर्म न मिळाल्याने माजी आमदार दिलीप माने यांचा हिरमोड झाला. दुसरीकडे सिध्देश्वर परिवाराचे प्रमुख धर्मराज काडादी यांनीही दुपारी अचानक निवडणूक कार्यालयात येऊन उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांना तुतारीकडून उमेदवारी मिळेल अशी हवा उठली होती. मात्र शेवटपर्यंत त्यांना तुतारी मिळाली नाही, त्यांनीही अपक्ष अर्ज दाखल केला.

दक्षिण विधानसभेसाठी महाआघाडीकडून ठाकरे गटामार्फत अमर पाटील यांना उमेदवारी जाहीर झाली. त्यामुळे माजी आ. दिलीप माने आणि धर्मराज काडादी हे अस्वस्थ झाले. दोघांनीही बैठका घेत उमेदवारी देण्याच्या मागणी लावून धरली. अखेर माने यांची उमेदवारी काँग्रेसला जाहीर करावी लागली. त्यानंतर काडादी यांनी आपला निर्णय ज्येष्ठ नेते शरद पवार आणि सुशीलकुमार शिंदे यांच्यावर सोपवला.

उमेदवार अर्ज भरण्याच्या शेवटदिवशी दुपारपर्यंत दिलीप माने यांच्यापर्यंत ए.बी. फॉर्मच आला नाही. त्यानंतर सोलापुरात अशी अफवा पसरली की, काँग्रेसने दिलीप माने यांचा पत्ता कट करून पवार गटाने तुतारीचा ए बी फॉर्म धर्मराज काडादी यांना दिला आहे. दुपारनंतर सोलापुरात हीच चर्चा सर्वत्र ऐकण्यास मिळाली.

### आता ४ नोव्हेंबरपर्यंत उत्सुकता ताणणार

दक्षिणमध्ये मोठा पेच निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीकडून अमर पाटील यांनी उमेदवारी दाखल केली आहे. काँग्रेसचे दिलीप माने यांनी अपक्ष तसेच आता धर्मराज काडादी यांनीही अपक्ष अर्ज दाखल केला आहे. आता चार नोव्हेंबर रोजी कोण माघार घेणार आणि कोण मैदानात राहणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार



अडीचच्या सुमारास निवडणूक कार्यालयात गेलेले धर्मराज काडादी हे रात्री साडेसात ते आठ पर्यंत आतमध्ये होते. मात्र त्यांना पवार गटाकडून ए.बी. फॉर्म आलाच नाही, त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे.

---

### माढ्यातील समीकरणे बदलणार

# तुतारी फुंकताच अभिजितआबा जरांगेच्या भेटीला

✔ पंढरपूर/प्रतिनिधी



माढ्याच्या उमेदवारीसाठी सुरू असलेला संघर्ष अखेर संपला. अभिजीत पाटील यांनी बाजी मारली आणि त्यांच्या हातात पवार गट पक्षाचा अधिकृत एबी फॉर्म मिळाला. तुतारी फुंकताच अभिजीत पाटील यांनी तातडीने अंतरवाली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यामुळे आता माढ्याची समिकरणे बदलण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

आमदार बबनदादा शिंदे हे अजित पवार गटाचे आमदार असून लोकसभा निवडणुकीत जरांगे फॅक्टरमुळे माढा विधानसभेतून जवळपास ५५ हजार मतांची पिछाडी महायुतीच्या उमेदवाराला मिळाली होती. यामुळेच सावध होत आमदार शिंदे यांनी अजितदादांची साथ सोडत आपण शरद पवार गटाकडून निवडणूक लढविणार किंवा अपक्ष लढवू मात्र महायुतीचे तिकीट घेणार नाही अशी जाहीर भूमिका घेतली होती. गेले आठ दिवस उमेदवारीसाठी ते शरद पवार यांच्याकडे सातत्याने प्रयत्न करत होते. मात्र, अखेर शरद पवार यांनी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्यावर विश्वास दाखवत त्यांच्या हातात तुतारी सोपवली. सोमवारी बबनदादा शिंदे यांनी आपली ताकद दाखवण्यासाठी माढा शहरांमध्ये विराट रॅली घेतली.

रणजित शिंदे यांना तुतारी न मिळाल्यास अपक्ष निवडणूक रिंगणात उतरवायचे का असा सवाल कार्यकर्त्यांना केला होता. याचे कारणही तसेच होते जो जरांगे फॅक्टर माढा विधानसभेत दिसला होता ते पाहता कार्यकर्त्यांची भूमिका ही आमदार शिंदे यांनी तुतारी घेऊनच निवडणूक लढवावी अशी होती. मात्र पवारांनी डावल्यानंतर अपक्ष निवडणूक लढवण्याची भूमिका त्यांनी जाहीर केली होती. सोमवारी रात्री शरद पवार यांची पुन्हा एकदा भेट घेतल्यावर बबनदादा शिंदे यांना पवारांनी स्पष्ट नकार दिला आणि त्यांची शरद पवार गटाची दार आता पूर्ण बंद झाली आहेत.

### जरांगे यांच्या निर्णयाकडे लक्ष

सध्या तरी अभिजीत पाटील यांनी तुतारी घेऊन बाजी मारली तशीच जरांगे यांच्याशी भेट घेत एक पाऊल पुढे टाकले आहे. यंदा जरांगे पाटील महाराष्ट्रात काही ठिकाणी उमेदवार देणार असून माढ्यातून त्यांचे निकटवर्तीय धनाजी साखळकर यांनी उमेदवारी दाखल केली आहे. आता जरांगे माढ्याच्या बाबतीत काय निर्णय घेणार हे येत्या ३० तारखेला दिसणार असले तरी अभिजीत पाटील यांनी त्यांच्या भूमिकेला समर्थन देत जरांगे यांची भेट घेतल्याने माढा मतदारसंघातील मराठा मतदार कोणाला कौल देणार हे पाहणंही महत्त्वाचं ठरणार आहे.

CMYK